वयोगट 12 ते 14

जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण विचार

## उन्हाळी सुट्टी

# वेध उपक्रम



**वेध परिवार**



**श्री. नंदकुमार (IAS)**
**वेध प्रेरणास्रोत**

**नमस्कार,**

**विद्यार्थी मित्रांनो!**

मुलांनो उन्हाळी सुट्टीची आपण आतुरतेने वाट पाहत होतात, त्या उन्हाळी सुट्ट्या आता सुरु आहेत. उन्हाळी सुट्टी खेळणे-बागडणे याची जेवढी संधी देते तेवढीच संधी नवीन बाबी शिकण्यासाठी पण मिळते. आपल्याला मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करून, शैक्षणिक वर्षात छंद जोपण्यासाठी वेळ मिळाला नाही ती कमतरता भरून काढू. आवडीचे काम करत या वेळी नवनवीन गोष्टी शिकूया.

सुट्टीमध्ये आपले छंद जोपासण्यासोबतच आपल्यातील नवनिर्मितीला वाव मिळावा. सृजन आणि तार्किक क्षमता वाढावी यासाठी वेध परिवाराकडून उन्हाळी सुट्टीतील उपक्रम तयार करण्यात आले आहेत. तुम्हाला आवडतील असे विविध उपक्रम, कृती, प्रात्यक्षिके, छोटी-छोटी गृह्कार्ये देण्यात आलेली आहेत. सदर उपक्रमातून तुम्हाला आनंद तर मिळेलच, सोबत शिकणे सुद्धा होईल. उन्हाळी उपक्रम करतांना आवश्यक तेथे घरातील नातेवाईकांची मदत घेता येईल. यानिमित्ताने त्यांचा सहवास आणि स्नेह लाभेल. उन्हाळी सुट्टी उपक्रम पुस्तिका विकसित करणाऱ्या सर्व वेध स्त्रोत आणि समन्वय साठी श्रीमती. वनिता कोले यांचे अभिनंदन.

सुट्टीमधील या गंमतीशीर आणि आनंददायी अभ्यासासाठी तुम्हाला खूप खूप शुभेच्छा!

**श्री. नंदकुमार (IAS)**
**वेध प्रेरणास्रोत**



**श्री. निलेश घुगे,**
**वेध संयोजक**

**सर्वांना नमस्कार,**

सध्याचा काळ हा तंत्रज्ञानाचा आहे. दिवसेंदिवस जग झपाट्याने बदलत आहे. इंटरनेट, कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅट जीपीटी इ. बाबींच्या मदतीने आपला मानव झपाट्याने प्रगती करत आहे. या बदलत्या जगामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर आपल्या नियमित पाठ्यक्रमाबरोबरच इतर उपयुक्त कौशल्य सुद्धा आत्मसात करावे लागणार आहेत. म्हणून आपण आपल्यातील निर्मितीचे कौशल्य वृद्धिंगत करून क्रिटिकल थिंकिंग वाढीस लागावी यासाठी दररोज नवीन काहीतरी शिकावे लागणार आहे.

उन्हाळ्याच्या सुट्टीत आहे तिथे, हसत-खेळत स्वत: शिकण्याची संधी वेध परिवार निर्माण करत आहे. वेध परिवाराने दिलेला अभ्यास स्वतः आणि आवश्यकता असेल तेव्हा घरातील इतर मंडळीच्या सहकार्याने करता येणार आहे. या मजेदार उपक्रम/कृती करताना आपल्याला छान अनुभव येतील. कृतीतून चिंतनाद्वारे शिकणे म्हणजे आपसूकच उपयोजनाला वाव मिळेल आणि तेव्हा आपण स्वतःच ज्ञानाची रचना करू शकू. कृतीतून मिळालेले हे ज्ञान नक्कीच कायमस्वरूपी उपयुक्त ठरणारे असणार आहे. म्हणून आपण या कृतींचा मनसोक्त आनंद लुटुया.

आपल्या सर्वांना पुढील एक महिनाभर हसत खेळत शिकण्यासाठी खूप खूप हार्दिक शुभेच्छा!

**श्री. निलेश घुगे,**
**वेध संयोजक**

# प्रस्तावना

**“मुलांसोबत सुलभकांनी/शिक्षकांनी आचाराने नव्हे तर विचाराने राहायला हवे...”** असं **'वेध'** नेहमीचं म्हणत आलेला आहे. कोरोना कालावधीत जेव्हा सगळीच नित्यकार्ये थांबली होती. त्यावेळी झूम या ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून वेध PLC ने काम सुरू केलं. वेधसोबत जुळलेल्या शिक्षकांनी मग याच पद्धतीने मुलांसोबत काम केलं आणि त्याचे चांगले परिणामही मिळाले. शिक्षक ऑनलाईन च्या माध्यमातून मुलांसोबत सतत आहेत. त्यामुळे शाळा सुटलेली असो, रविवारची सुट्टी असो किंवा मग दिवाळी अन उन्हाळी सुट्टी असो मुलांचं शिकणं थांबलेलं नाहीये आणि थांबणारही नाही.

नुकतीच 2 मे पासून संपूर्ण राज्यात उन्हाळी सुट्टी सुरू झाली. सगळीकडे **'मामाचं गाव'** अन **'समर कॅम्प'** ची लगबग सुरू झाली. मुलांची पालकांना एकच विनंती की, **"अभ्यास सोडून दुसरं काहीही सांगा आम्ही करायला तयार आहोत."** हाच धागा पकडून मग वेध ग्रुपने राज्यातील मुलांसोबत विविध उपक्रमांच्या माध्यमातून कसं काम करता येईल यावर विचारमंथन करून डॉक्युमेंट बनविले. ज्यातून मुलांचं शिकणं तर सुरू राहील पण त्यांना कंटाळाही येणार नाही.

प्रस्तुत डॉक्युमेंट मध्ये आपणांस एकूण वर्गानुसार चार भाग दिसून येतील. ज्यामध्ये प्रवेशित 1 ली ते 12 वी पर्यंतच्या मुलांना वयोगटानुसार उपक्रमांची आखणी केलेली आहे. मुलांसाठी **घरातील अगदी छोट्या कामापासून ते आर्थिक आणि राजकीय** गोष्टींपर्यंत उपक्रमांच्या आधारे आपण मुलांना **'सहज शिक्षण'** देणार आहोत. या उपक्रमांमध्ये मुलांसोबतच त्यांचे शिक्षक, मित्र, पालक, नातेवाईक यांचाही सहभाग असणार आहे. मुलांना अधिकचे काही देता यावे यासाठी आपण विविध क्षेत्रात काम करणारे मान्यवर, यशस्वी मुले यांचेही झूम किंवा युट्युबच्या माध्यमातून **'हितगुज'** सत्र ठेवणार आहोत. आपले काही **'वेधस्रोतही'** ऑनलाईन च्या माध्यमातून आपल्या भेटीला येतील.

चला तर मग मुलांनो **"खेळता-खेळता शिकूया आणि शिकता-शिकता खेळूया..."**

**वेध परिवार, महाराष्ट्र**

## **सर्वसाधारण सूचना** विद्यार्थी **व सुलभक यांच्यासाठी**

1) सुलभक याचा अर्थ मुलांचे शिक्षक, पालक, मित्र, शेजारी, नातेवाईक जे कुणी उपक्रम करताना मुलांसोबत असणार आहेत.

2) उपक्रमांची रचना वर्ग लक्षात घेऊन करण्यात आलेली आहे.

3) उपक्रमांचा क्रम जसा आहे तसेच उपक्रम घ्यायला हवेत असे बंधन नाही.

4) दिलेला उपक्रम वैयक्तिक करायचा की पिअरने(शिकण्यास पूरक अशी जोडी) करायचा किंवा ग्रुपने करायचा याचा निर्णय मुलाने घ्यावा पण सुलभकही त्याला नक्कीच निर्णय घेण्यात मदत करू शकतो.

5) उपक्रम घेत असताना तो उपक्रम व त्याखाली दिलेले सर्व मुद्दे यांचे काळजीपूर्वक वाचन करूयात मगच उपक्रम घेऊयात.

6) सुलभकांसाठी उपक्रमात काही विशेष सूचना असतील तर त्याचे काटेकोरपणे पालन करूयात.

7) आपल्या मुलाचा उपक्रमात किती कृतिशील सहभाग आहे त्यानुसार खालच्या किंवा वरच्या वर्गाचे उपक्रम घेण्याचे आपणास पूर्ण स्वातंत्र्य आहे.

8) एखादा उपक्रम समजला नसेल तर त्या गटाची श्रेयनामावली व नंबर दिलेले आहेत आपण संपर्क करू शकता.

9) उपक्रम घेतलेले काही नाविन्यपूर्ण फोटो, आठवणी ग्रुपवर शेअर करूयात. त्यामुळे इतरांना प्रेरणा मिळेल.

10) सर्व उपक्रमांचा आनंद मुलांसोबत आपणही घेऊयात.

**आपणांस व आपल्या परिवारास उन्हाळी सुट्टीच्या वेध परिवाराकडून खूप-खूप शुभेच्छा !**

# उपक्रम 01

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | तुम्हाला ज्या भाषा येतात त्या भाषांमध्ये  स्वतःचा परिचयाचे व्हिडिओ शेअर करूया. |
| ● **उद्देश** | : | मुलांची भाषिक क्षमता विकसित होते.<br>मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो. |
| ● **साहित्य** | : | मोबाईल. |
| ● **सूचना** | : | पालकांच्या मदतीने विविध साहित्य गोळा करणे |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, पिअर, ग्रुप |
| ● **6 Cs** | : | कम्युनिकेशन,  कॉन्फिडन्स |
| ● **9 Intelligences** | : | आंतरव्यक्ती, व्यक्तिअंतर्गत बुद्धिमत्ता |

# उपक्रम 02

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **सीडबँक तयार करा व त्या बियापासून सीडबॉल तयार करा.** |
| ● उद्देश | : | १) वृक्षारोपनाचे महत्व समजणे. व बियांचे वर्गीकरण करणे.<br>२) वृक्षारोपणाच्या संवर्धनाचे महत्त्व समजणे. |
| ● साहित्य | : | कोरड्या चिकन मातीचे पाच भाग सेंद्रिय भांडी, माती,बिया, मिक्सिंग वाडगा<br>सीड बॉल सुकवण्यासाठी शीट मेणाचा कागद. |
| ● Youtube link | | **YouTube link :**<br>https://youtu.be/pJpHErDzDdk?si=Tpnx4hJIBP8p0lLs |
| ● सूचना | : | बिया गोळा करत असताना उन्हाचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>व्हिडिओ पाहून सीडबॉल बनवा. |
| ● Learning intervention | : | Group, peer. |
| ● 6 Cs | : | creative thinking. |
| ● 9 Intelligences | : | या उपक्रमातून क्रियाशीलता, संग्रह वृत्ती, शरीरस्नायू विषयक बुद्धिमत्ता, निरीक्षण क्षमता विकसित होतात. |

## उपक्रम 03

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | **आठवड्यातून एकदा कॉन्फरन्स कॉल द्वारे शिक्षक, मित्रांशी गप्पा मारा.** |
| ● **उद्देश** | : | १) सुसंवाद घडवून आणणे.<br>२) मित्राची शिक्षकांशी चर्चा करणे. |
| ● **साहित्य** | : | मोबाईल |
| ● **सूचना** | : | आई-वडिलांची परवानगी घेऊनच कॉल करा. |
| ● **Learning intervention** | : | Group |
| ● **6 Cs** | : | collaboration, communication. |
| ● **9 Intelligences** | : | भाषिक बुद्धिमत्ता, अंतर व्यक्ती बुद्धिमत्ता. |

## उपक्रम 4

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | **आई-वडिलांना कामात मदत करा. आजी आजोबांची सेवा करा व त्याचे व्हिडिओ ग्रुप वर पाठवा.** |
| ● **उद्देश** | : | १) आई-वडिलांविषयी संवेदनशीलता निर्माण करणे.<br>२) छोट्या मोठ्या कामांची सवय लागणे.<br>३) आजी आजोबांविषयी प्रेम निर्माण होणे. |
| ● **सूचना** | : | आई-वडिलांच्या मदतीने कामात मदत करणे. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक |
| ● **6 Cs** | : | Collaboration |
| ● **9 Intelligences** | : | शरीरस्नायू विषयक बुद्धिमत्ता. आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता. |

# उपक्रम 5

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | **चला जेवण बनवूया.**<br>a) भाकरी करण्याचा व्हिडिओ बनवणे.<br>b) कोणतेही तीन नवीन पदार्थ शिकणे.<br>c) एखादा पदार्थ तयार करण्यासाठीची पाककृती लिहिणे. |
| ● **उद्देश** | : | **१) स्वयंपाक करता येणे. स्वयंपाका विषयी आवड निर्माण होणे.**<br>**२) वेळप्रसंगी स्वत:चे जेवण स्वत:ला बनवता येणे.** |
| ● **साहित्य** | : | स्वयंपाकाचे सर्व साहित्य. |
| ● **सूचना** | : | **पालकांच्या देखरेखीखाली ही कृती करा.** |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक. |
| ● **6 Cs** | : | creative thinking, collaboration. |
| ● **9 Intelligences** | : | शरीर स्नायू विषयक बुद्धिमत्ता, व्यक्ती अंतर्गत बुद्धिमत्ता. |

# उपक्रम 6

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **चला छोट्या छोट्या कामात आईला मदत करुया** |
| ● उद्देश | : | १) मदतीचे महत्व समजणे.<br>२) दुसऱ्यांना केलेल्या मदतीचे परीणाम समजणे.<br>३) मदतीने कामाची गतीमानता वाढते हे समजणे.<br>४) नाते सृदृढ होते हे समजून घेणे. |
| ● सूचना | : | **आईने सांगितलेली काम करणे.** |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक. |
| ● 6 Cs | : | collaboration(सह्योग), communication(संवाद), compassion |
| ● 9 Intelligences | : | **क्रियाशीलता, विशेष बुद्धिमत्ता, आंतरिक बुद्धिमत्ता.** |

## उपक्रम 7

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | **पुढील गोष्टी शिकूया** |
| ● **उद्देश** | : | १) पोहायला शिकणे.<br>२) झाडावर कसं चढायचं हे समजणे.<br>३) विविध देशी खेळांना समजून घेणे.<br>४) ट्रेकिंग किंवा डोंगरावर चढायाचे कौशल्य आत्मसात करणे.<br>५) खेळांचे महत्व समजणे. |
| ● **साहित्य** | : | सुरक्षिततेची सर्व साधने, ट्रेकिंग सूट, पोहण्याची सेफ्टी किट, दोरी. |
| ● **सूचना** | : | **१) ट्रेकिंग करतांना तज्ञ मार्गदर्शकाचे मार्गदर्शन घ्यावे**<br>**२) मोठ्यांच्या मदतीने पोहायला शक्य झाल्यास जावे.**<br>**( एकट्याने नदी किंवा विहिरी कडे जावू नये.)**<br>**३) डोंगरमाथा चढायचा सराव करतांना तज्ञांचे मार्गदर्शन घेणे.** |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, ग्रुपमध्ये. |
| ● **6 Cs** | : | **सर्जनशीलता, सुसंवाद, चिकित्सक विचार, आत्मविश्वास.** |
| ● **9 Intelligences** | : | **निरीक्षण क्षमता, विशेष बुद्धिमत्ता, क्रियाशीलता.** |

## उपक्रम 8

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **विविध श्लोक पाठांतर करूया** |
| ● उद्देश | : | १) श्लोकांचा अर्थ समजून घेणे.<br>२) श्लोकांचा उद्घोष सहजरित्या करणे.<br>३) श्लोकांचा आशय समजून सांगणे. |
| ● साहित्य | : | श्लोकांची टिपण वही, विविध ग्रंथ, ध्वनीमुद्रण साहित्य. |
| ● सूचना | : | उपलब्ध ग्रंथाचा वापर सुयोग्य स्थितीत करणे. |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक. |
| ● 6 Cs | : | चिकित्सक विचार, सुसंवाद, करुणा. |
| ● 9 Intelligences | : | आंतरिक बुद्धिमता, विशेष बुद्धिमत्ता, संग्रहवृत्ती. |

## उपक्रम 9

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **किमया वर्तमानपत्राची** |
| ● उद्देश | : | १) वाचनाचे महत्व समजणे **व** आवड निर्माण होणे.<br>३) जाहिराती, कात्रणे यांचा संग्रह करणे.<br>४) वर्तमानपत्राणे **भाषिक** ,गणितीय, शाब्दिक कोडे अर्थासह अचूकपणे सोडवणे.<br>५) वर्तमानपत्रा**तील** बाल साहित्याचा संग्रह करणे.<br>६) वर्तमान पत्रा**तील** भौगोलिक, वैज्ञानिक माहितीचे संकलन करणे.<br>७) वर्तमानपत्रापासून कागदी पिशव्या तयार करणे.<br>८) चालू घडामोडींचे वाचन करुन नोंदी घेणे.<br>९) वर्तमानपत्राणे बातम्याचे वाचन करून त्यावर भाष्य करणे. |
| ● साहित्य | : | टिपणवही, कात्री, दररोज येणारे वर्तमानपत्र. |
| ● सूचना | : | वर्तमानपत्र सुव्यवस्थित ठेवावे. |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक. |
| ● 6 Cs | : | चिकित्सक विचार, सर्जनशीलता, आत्मविश्वास, करुणा. |
| ● 9 Intelligences | : | संग्रहवृत्ती, विशेष बुद्धिमता, निरीक्षणक्षमता. |

## उपक्रम 10

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | **केल्याने देशाटन**<br>**( शक्य असेल त्या ठिकाणी सहलीला जा.)** |
| ● **उद्देश** | : | १) प्रवासाचे महत्व समजणे.<br>२) नवीन ठिकाणचे अनुभव आत्मसात करणे.<br>३) नवनवीन परिसराची माहिती प्राप्त करणे.<br>४) आलेल्या प्रवास अनुभवाचे लेखन अचूकपणे करणे.<br>५) विविध भौगोलिक भागांची,परिसराची माहिती आत्मसात करणे. |
| ● **साहित्य** | : | नोंदवही, प्रवासाला लागणारी सामग्री. |
| ● **सूचना** | : | १) प्रवास करतांना मोठ्याचे मार्गदर्शन घ्यावे.<br>२) अनोळखी ठिकाणी जातांना आवश्यक ती काळजी घ्या. |
| ● **Learning intervention** | : | Peer, Group |
| ● **6 Cs** | : | करुणा, सुसंवाद, सहयोग, चिकित्सक विचार. |
| ● **9 Intelligences** | : | आंतरिक बुद्धिमत्ता, निरीक्षणक्षमता. |

# उपक्रम 11

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | विविध विषयावर लेखन करूया. |
| ● **उद्देश** | : | १) विविध विषयांवर निबंध अचूकपणे लिहिणे/लिहिते.<br>२) मराठी भाषेत तसेच हिंदी, इंग्रजी भाषेत सहजपणे निबंधलेखन करणे.<br>३) नातेवाईकांना, मित्रांना पत्र लिहिणे.<br>४) आई-वडीलांचा,भावा-बहिणीचा संवाद स्पष्टपणे लेखन करणे.<br>५) दोन व्यक्ती मधील सहसंवादाचे सहजरित्या लेखन करणे.<br>६) दोन व्यावसायिक मधील संवांदाचे लेखन करणे.<br>७) दोन शेतकऱ्यांमधील संवाद लेखन करणे. |
| ● **साहित्य** | : | वही, पेन, नोंदवही. |
| ● **सूचना** | : | १) लेखन करतांना सुवाच्च अक्षर काढावी.<br>२) निबंधलेखन ची सर्व नियम पाळावीत.<br>३) अक्षरांवर रेषा द्याव्यात.<br>४) निबंधलेखन करतांना समर्पक उदाहरणे द्यावी. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक. |
| ● **6 Cs** | : | सर्जनशीलता, आत्मविश्वास, संवाद. |
| ● **9 Intelligences** | : | विशेष बुद्धिमत्ता, निरीक्षणक्षमता, तार्किक बुद्धिमता. |

# उपक्रम 12

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | चला बाग काम करूया...<br>अ) घरच्या घरी बाग तयार करण्यासाठी टाकाऊ वस्तू पासून कुंड्या तयार करून माती भरून ठेवणे.<br>ब) घरासमोरील परसबागेत, शेतात जाऊन मदत करा. |
| ● उद्देश | : | 1) बागेविषयी माहिती सांगणे.<br>2) टाकाऊ वस्तूचा वापर करणे.<br>3) वेस्ट मधून बेस्ट करणे. |
| ● साहित्य | : | कुदळ, विळी, फावड चा वापर. |
| ● सूचना | : | कुंड्या तयार करतांना लोखंडी वस्तूंच्या इजा होणार नाही असा वापर करावा. |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक, ग्रुप |
| ● 6 Cs | : | **Collaboration, compassion** |
| ● 9 Intelligences | : | शरीरस्नायू विषयक बुद्धिमत्ता. |

# उपक्रम 13

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | चला काहीतरी लिहूया.<br>अ) बोधकथा ऐकून स्वतःच्या शब्दात लेखन करा.<br>ब) तुम्हाला आलेले चांगले वाईट अनुभव लिहून काढा.<br>क) यशस्वी लोकांच्या कथा ऐका.<br>ड) मोबाईलवर चांगल्या गोष्टी ऐका . |
| ● **उद्देश** | : | 1) बोधकथा मधून विविध बोध घेणे.<br>2) अनुभव सांगता येणे.<br>3) यशस्वी लोकाच्या चरित्राचे अनुकरण करणे.<br>4) चांगल्या गोष्टींसाठी मोबाईल हाताळणे. |
| ● **साहित्य** | : | १) कथासंग्रह, गोष्टीची पुस्तके.<br>२) वही, पेन.<br>३) मोबाईल.<br>**https://youtu.be/CrKSv4U-7VA?si=Jd0ezK0orNiNeBiJ**<br>**https://youtu.be/kdXa4J_lKcY?si=orrMyHc7Yzg** |
| ● **सूचना** | : | मोबाईलचा वापर काळजीपूर्वक करावा. सांगितलेल्या गोष्टींसाठी मोबाईल वापरावा. |
| ● **Learning intervention** | : | personal, peer, group. |
| ● **6 Cs** | : | क्रिटिकल थिंकिंग. |
| ● **9 Intelligences** | : | भाषिक बुद्धिमत्ता. |

## उपक्रम 14

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | **चला व्हिडिओ तयार करुया**<br>**आपण जे काही छोटेमोठे इतरांना कौतुक व प्रेरणादायी वाटेल असे काम करत असू तर त्याचे आपण छान आकर्षक व्हिडिओ तयार करुयात.** |
| ● **उद्देश** | : | १) केलेल्या कामाचे व्हिडिओ तयार करणे.<br>२) व्हिडीओव्दारे केलेल्या कामाची माहिती सहजरित्या इतरांना सांगणे.<br>३) तयार केलेल्या व्हिडिओचे संकलन करणे.<br>४) संकलन केलेल्या व्हिडिओ माहितीच्या नोंदी ठेवणे. |
| ● **साहित्य** | : | मोबाईल, फोन, नोंदवही, मोबाईल स्टॅण्ड. |
| ● **सूचना** | : | व्हिडिओ तयार करतांना आवश्यक तिथे मित्रांची मदत घ्यावी. |
| ● **Learning intervention** | : | **Group.** |
| ● **6 Cs** | : | आत्मविश्वास, संवाद, सर्जनशीलता, चिकित्सक विचार. |
| ● **9 Intelligences** | : | **आंतरिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता.** |

# उपक्रम 15

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | **कार्यानुभव कलाकृती बनवूया...** |
| ● **उद्देश** | : | १) कागदी कलाकृतीची माहिती गोळा करणे.<br>२) वेगवेगळ्या कागदी कलाकृती सहजतेने तयार करणे.<br>३) चिखलापासून मनासारख्या कलाकृती बनवणे.<br>४) आवडीनुसार कोलाज कामाची माहिती गोळा करणे.<br>५) आवडीनुसार वेगवेगळ्या कोलाज कलाकृती साकारणे. |
| ● **साहित्य** | : | विविध रंगाचे कागद, गोंद, कात्री, ओलीमाती इत्यादी. |
| ● **सूचना** | : | १) कागदी कलाकृती तयार करतांना कात्रीपासून इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>२) चिखलांमुळे कपड्यावर डाग पडणार नाही याची काळजी घ्यावी. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक. |
| ● **6 Cs** | : | सर्जनशीलता, चिकित्सक विचार, आत्मविश्वास, संवाद. |
| ● **9 Intelligences** | : | तार्किक बुद्धिमत्ता, निसर्गविषयक बुद्धिमत्ता. |

# उपक्रम 16

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **Youtube live सेशन अटेंड करा.** |
| ● उद्देश | : | विविध शिक्षकांचे मार्गदर्शन ऐकणे. |
| ● साहित्य | : | मोबाईल |
| ● सूचना | : | **YouTube link :-** ऐनवेळी सुट्टीमध्ये ग्रुप वर येईल. लिंक येईल तेंव्हा सूचनेनुसार आवश्यक जॉईन व्हावे. |
| ● Learning intervention | : | Peer |
| ● 6 Cs | : | Critical thinking, Creative thinking, Collaboration, Communication. |
| ● 9 Intelligences | : | भाषिक बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता व्यक्तीअंतर्गत बुद्धिमत्ता. |

# उपक्रम 17

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | चला इंग्रजीत संभाषण करुया...<br>आजच्या आधुनिक युगात टिकायचे असेल तर नव्या युगाच्या बदलासमवेत आपल्यालाही बदलावेच लागेल म्हणून,<br>चला आपण इंग्रजी भाषेत संभाषण करूया .......! बोलूया........! |
| ● **उद्देश** | : | १) इंग्रजी भाषेच्या वाक्यांचा सराव करणे.<br>२) स्पोकन इंग्लिश वेधकृतींची माहिती समजून घेणे.<br>३)वेधकृतींचा मुबलक प्रमाणात सराव करणे.<br>४) प्रत्येक वेधकृतींचा आशय अचूकपणे समजून घेणे. |
| ● **साहित्य** | : | नोंदवही, मोबाईल, स्पोकन इंग्लिश वेधकृती पुस्तक |
| ● **सूचना** | : | १) शब्दांचा अर्थ अचूकपणे समजून घ्यावा.<br>२) सराव वाढवावा.<br>वेध कृती पुस्तक पान क्रं. ( ३०ते ४१)<br>Link –<br>1) family members and tree.<br>2) https://YouTube.be/JFYBZa2PY6k |
| ● **Learning intervention** | : | गटात , वयक्तिक |
| ● **6 Cs** | : | संवाद, करुणा, आत्मविश्वास |
| ● **9 Intelligences** | : | भाषिक, तार्किक बुद्धिमत्ता |

# उपक्रम 18

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | चला Reels बनवूया... <br> या युगाला नवनिर्मितीचे युग असेही संबोधतात. सहज केलेली कृती कधी अवघ्या समाजाची ओळख होईल हे सांगता येत नाही.. तेव्हा चला आपणही या बदलात समरस होऊन नव्या युगाची नवी फॅशन म्हणून शैक्षणिक Reels  बनवूया... |
| ● **उद्देश** | : | १) आपल्या आवडीनुसार शैक्षणिक reals बनवणे. <br> २) आवश्यक ती शैक्षणिक माहिती गोळा करणे. <br> ३) बनविलेल्या रीलसची माहिती सहजरित्या व्यक्त करणे. <br> ४) इतरांना मदतगार ठरेल अशा उपयुक्त शैक्षणिक रील्स बनवणे. |
| ● **साहित्य** | : | मोबाईल |
| ● **सूचना** | : | कुणाच्या  भावना दुखावणार नाही, याची काळजी रील्स बनवतांना घ्यावी. २) रील्स साठी फक्त शैक्षणिक बाबींचाच विचार करावा. |
| ● **Learning intervention** | : | गटात, वैयक्तिक |
| ● **6 Cs** | : | आत्मविश्वास, संवाद, सर्जनशीलता, चिकित्सक विचार |
| ● **9 Intelligences** | : | तार्किक बुद्धिमत्ता, भाषिक बुद्धिमत्ता |

## उपक्रम 19

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | भविष्यातील माझे गाव<br>स्वतःच्या गावाचे भविष्य लिहा किंवा भविष्यात माझा गाव कसा असेल ते लिहा. |
| ● **उद्देश** | : | १) स्वताच्या गावाची माहिती करून घेणे.<br>२) गाव कसा असावा याविषयी विचार करणे. |
| ● **साहित्य** | : | वही , पेन |
| ● **सूचना** | : | सुरुवातीला आदर्श गावाची कल्पना समजून घ्यावी. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक किंवा ग्रुप |
| ● **6 Cs** | : | Critical, Creative thinking |
| ● **9 Intelligences** | : | भाषिक बुद्धिमत्ता, अंतर व्यक्ती बुद्धिमत्ता. |

## उपक्रम 20

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | चला व्यवहार करूया...<br>अ) रेशन दुकान, बँकेची कामे या कामासाठी पालकांसोबत जावून आर्थिक व्यवहार जाणून घ्या.<br>ब) ऑनलाईन पैसे ट्रान्सफर करणाऱ्या सुविधांबाबत माहिती घेऊन त्याबाबतची दक्षता घ्या. |
| ● **उद्देश** | : | १) आर्थिक व्यवहार जाणून घेईल.<br>२) आर्थिक साक्षरता विकसित होईल.<br>३) दैनंदिन जिवानाणे व्यवहार व गणितीय ज्ञान यांची सागड घालेल.<br>४) आर्थिक फसवणूक कशी होते ते जाणून घेईल. |
| ● **साहित्य** | : | धनादेश (चेक), मोबाईल, बँक पासबुक, ATM कार्ड |
| ● **सूचना** | : | मोबाईल फोन, एटीएम कार्ड हाताळताना मोठ्यांच्या मार्गदर्शनाखाली कृती पार पाडाव्यात. |
| ● **Learning intervention** | : | गटात, वैयक्तिक |
| ● **6 Cs** | : | Communication, चिकित्सक विचार |
| ● **9 Intelligences** | : | तार्किक व भाषिक बुद्धिमत्ता |

# उपक्रम 21

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | तुम्ही पाहिलेल्या प्राणी व वनस्पतींची नावे, चित्रे गोळा करा. लेखन करा व संग्रही ठेवा. |
| ● उद्देश | : | १) विविध प्राणी व वनस्पती यांची ओळख करून घेणे.<br>२) प्राणीमात्रांविषयी प्रेम वाढविते.<br>३) निसर्गाणे सजीवसृष्टीत प्राण्यांचे महत्व जाणून घेणे .<br>४) विविध वनस्पतींची ओळख करून घेणे.<br>5) संग्रह व छंद वृत्ती जोपासण्यासाठी मदत होते. |
| ● साहित्य | : | विविध जुनी वर्तमानपत्रे, मोबाईल, विविध रद्दी, कात्री, डिंक, चित्राचे चार्ट, पुस्तके, कार्डशीट, पेपर |
| ● सूचना | : | कागद कापताना आवश्यक ती काळजी घ्यावी. फाडलेला कागद डस्ट बिन मध्ये टाकावा. |
| ● Learning intervention | : | गटात, वैयक्तिक |
| ● 6 Cs | : | चिकित्सक विचार, तार्किक |
| ● 9 Intelligences | : | तार्किक बुद्धिमत्ता, निसर्ग विषयक बुद्धिमत्ता |

# उपक्रम 22

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | पारंपारिक संस्कृती जपूया... <br> परिसरात गायली जाणारी विविध बोली भाषेणे गीतांचे संकलन किंवा संग्रह करा. |
| ● उद्देश | : | १) वेगवेगळ्या बोलीभाषा विषयी माहिती मिळविणे. <br> २) संग्रह वृत्ती बाळगणे. |
| ● साहित्य | : | अँड्रॉइड मोबाइल, वही, पेन |
| ● सूचना | : | वडीलधाऱ्यांकडून या गीतांचा संग्रह करा. |
| ● Learning intervention | : | Group, Peer, |
| ● 6 Cs | : | Communication, Collaboration, Compassion |
| ● 9 Intelligences | : | भाषिक बुद्धिमता |

# उपक्रम 23

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | छोट्या छोट्या प्रेरणादायी गोष्टींचे व्हिडिओ तयार करून शेअर करा. |
| ● उद्देश | : | १) मोबाईलच्या साह्याने छोटे छोटे व्हिडीओ तयार करेल.<br>२) प्रेरणादायी गोष्टींविषयी अधिकची माहिती जाणून घेणे.<br>३) स्वतः प्रेरित होऊन कुठलेही काम करणे. |
| ● साहित्य | : | अँड्रॉइड मोबाइल |
| ● सूचना | : | व्हिडिओ तयार करतांना अवश्य चर्चा करा. |
| ● Learning intervention | : | पियर, ग्रुप |
| ● 6 Cs | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग, कोलॅबरेशन, कॉन्फिडन्स |
| ● 9 Intelligences | : | तार्किक, अवकाशीय, भाषिक |

## उपक्रम 24

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | माझी आवड माझा छंद<br>अ) तुमच्या आवडीच्या नृत्याचा व्हिडिओ तयार करा.<br>ब) गायन कला शिका. |
| ● **उद्देश** | : | १) विवध छंद व आवड जोपासणे.<br>2) गायन कला विषयी अधिक ची माहिती मिळवणे. (स्वर, वाद्य इत्यादी)<br>३) स्वत: शिकण्यात आनंद मिळवणे. |
| ● **साहित्य** | : | अँड्रॉइड मोबाइल , स्पिकर |
| ● **सूचना** | : | पालकांची/नातेवाईक मदत घ्यावी |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, ग्रुप, पियर |
| ● **6 Cs** | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, कोलाब्रेशन, कंपेशन, कॉन्फिडन्स. |
| ● **9 Intelligences** | : | शारीरिक, सांगीतिक. |

# उपक्रम 25

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | तुम्हाला येणारे छोटे छोटे वैज्ञानिक प्रयोग करा. |
| ● उद्देश | : | १) वैज्ञानिक दृष्टी निर्माण होईल.<br>२) जिज्ञासू वृत्ती वाढीस लागेल. |
| ● साहित्य | : | आवश्यक व्हिडीओ पाहून लागणारे प्रयोग साहित्य<br>YouTube link-<br>https://youtu.be/s87FhnwMcD0?si=yXI7CMEgRvT_F22n |
| ● सूचना | : | प्रयोगाचे साहित्य काळजीपूर्वक हाताळा. |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक, ग्रुपमध्ये |
| ● 6 Cs | : | क्रिटिकल थिंकिंग, क्रिएटिव्ह थिंकिंग, सेलिब्रेशन, कम्युनिकेशन कॉन्फिडन्स |
| ● 9 Intelligences | : | तार्किक बुद्धिमत्ता, शरीर स्नायू विषयक बुद्धिमत्ता |

# उपक्रम 26

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | गणितीय कोडी सोडवू या.. |
| ● **उद्देश** | : | १) गणिता विषयी आवड निर्माण होणे.<br>२) तार्किक विचार करणे |
| ● **साहित्य** | : | वही, कोरे कागद,पेन पेन्सील<br>link-<br>https://online.fliphtml5.com/gght/vtkf/ |
| ● **सूचना** | : | पालक/नातेवाईक यांना गणिती कोड्यांवरआधारित चर्चा करा. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, ग्रुप |
| ● **6 Cs** | : | Critical thinking, Creative thinking. |
| ● **9 Intelligences** | : | गणिती/ तार्किक बुद्धिमत्ता |

## उपक्रम 27

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | चला परदेशी भाषा शिकूया.<br>अ) परदेशी भाषेत (जर्मन) संख्या बनवा व छोटी छोटी वाक्य लिहा.<br>ब) एकच वाक्य मराठी इंग्रजी आणि जर्मन मध्ये बनवा.<br>( थोडक्यात परदेशी भाषेचा सराव) |
| ● **उद्देश** | : | परदेशी भाषेची ओळख करून घेणे.<br>२) परदेशी भाषा बोलता येते.<br>३) परदेशी भाषा शिकणे. |
| ● **साहित्य** | : | परकीय भाषेचे APP, GOOGLE TRANSLATER<br>YouTube link-<br>https://youtu.be/7KwhDAbhBG0?si=4ShhnrbS689oAB9F |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, ग्रुपमध्ये |
| ● **6 Cs** | : | क्रिटिकल थिंकिंग, कम्युनिकेशन |
| ● **9 Intelligences** | : | भाषिक बुद्धिमत्ता |

# उपक्रम 28

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | चला गायक बनूया<br>स्टार मेकर ॲप चा उपयोग करून, कराओके ट्रॅक सोबत गाणे म्हणा. रेकॉर्डिंग करा. |
| ● **उद्देश** | : | १) गाणे गायला शिकणे.<br>२) मनोरंजन व आनंद मिळवणे. |
| ● **साहित्य** | : | मोबाईल, YouTube, Google |
| ● **सूचना** | : | आई – वडिलांच्या परवानगीने मोबाईलचा वापर करावा. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, ग्रुपमध्ये |
| ● **6 Cs** | : | क्रिएटिव्ह थिंकिंग, कॉन्फिडन्स |
| ● **9 Intelligences** | : | सांगितिक बुद्धिमत्ता |

# उपक्रम 29

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | शरीर सुदृढ बनवूया....<br>अ) दररोज अर्धा तास सूर्यनमस्कार योगासनांचा सराव करा.<br>ब) दररोज 15 मिनिट सायकलिंग करा.<br>क) आनापान साधनेची माहिती घ्या व करा. |
| ● **उद्देश** | : | १) शारीरिक व्यायाम करणे.<br>२) मानसिक शांतता लाभेल.<br>३) सायकल चालवायला शिकेल. |
| ● **साहित्य** | : | सायकल ,चटई . |
| ● **सूचना** | : | योग्य मार्गदर्शकांकडून सूर्यनमस्कार व सायकल शिकून घ्यावी. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, ग्रुप मध्ये |
| ● **6 Cs** | : | Collaboration |
| ● **9 Intelligences** | : | शरीर स्नायू विषयक बुद्धिमत्ता |

# उपक्रम 30

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | गावातील स्वयंसेवी संस्थांची ओळख करून घेऊया.. |
| ● **उद्देश** | : | १) स्वयंसेवी संस्थांची माहिती समजून घेणे.<br>२) समाजसेवेचे महत्त्व सांगणे.<br>३) सभोवतालच्या परिसराणे स्वयंसेवी संस्थांची माहिती नोंदवणे.<br>५) समाजसेवी संस्था आणि स्वयंसेवी संस्थांचे आजच्या काळात किती महत्वाची आहे याची माहिती समजावणे. |
| ● **साहित्य** | : | मोबाईल, चार्टस, संकलित केलेले तक्ते. |
| ● **सूचना** | : | स्वयंसेवी संस्थांना भेटी देतांना प्रथम त्यांची परवानगी घ्यावी. |
| ● **Learning intervention** | : | ग्रुपमध्ये, वैयक्तिक |
| ● **6 Cs** | : | Communication, Compassion |
| ● **9 Intelligences** | : | भाषिक बुद्धिमत्ता, संग्रह वृत्ती. |

# उपक्रम 31

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | चला तारांगण पाहूया. |
| ● **उद्देश** | : | १)आकाशाचे सूक्ष्म निरीक्षण करणे .<br>२) दररोजच्या निरीक्षणाची अचूकपणे नोंद घेणे.<br>३)रोज रात्रीच्या निरीक्षणाणे फरक स्पष्टपणे ओळखणे. |
| ● **साहित्य** | : | वही , पेन, दुर्बीण |
| ● **सूचना** | : | १) आकाश निरीक्षण करतांना डोळ्यावर ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी.<br>२) आकाश निरीक्षण करताना छतावर असतांना पडणार नाही याची काळजी घ्यावी.<br>३) आकाश निरीक्षणे साधारणतः खुल्या मैदानात वा अंगणातून करावे. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, गट |
| ● **6 Cs** | : | चिकित्सक विचार, सृजनशीलता, आत्मविश्वास |
| ● **9 Intelligences** | : | तार्किक बुद्धिमत्ता, निरीक्षण क्षमता |

# उपक्रम 32

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | स्पर्धा परीक्षा जाणून घेऊया.... |
| ● उद्देश | : | १) स्पर्धात्मक परीक्षा म्हणजे काय हे समजून घेणे.<br>२)स्पर्धा परीक्षेचे महत्त्व सांगणे.<br>३)स्पर्धा परीक्षाची माहितीचे संकलन करणे.<br>४) स्पर्धात्मक परीक्षा अभ्यासक्रमाची ओळख करुन घेणे. |
| ● साहित्य | : | स्पर्धा परीक्षेची पुस्तके, नाथे पब्लिकेशनची पुस्तके, नोंद वही.<br>You tube link -<br>https://www.youtube.com/live/6Yrjz3_nKl4?si=sihzHNIJobyB-kFo |
| ● सूचना | : | स्पर्धा परीक्षा, अभ्यासक्रमाची पुस्तके काळजीपूर्वक व सुरक्षित ठेवणे. |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक, पिअर |
| ● 6 Cs | : | सर्जनशीलता,आत्मविश्वास, संवाद |
| ● 9 Intelligences | : | व्यक्ती अंतर्गत बुद्धिमत्ता, तार्किक बुद्धिमत्ता. |

# उपक्रम 33

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **पक्षी निरीक्षण करुया....** |
| ● उद्देश | : | १) सभोवताली असणाऱ्या पक्ष्यांचे निरीक्षण करणे.<br>२) विविध पक्षांणे फरक ओळखणे.<br>३)पक्ष्यांचा भरणपोषण साठी भांड्यात पाणी ठेवणे.<br>४) पक्ष्यांच्या संरक्षणासाठी घरटी तयार करणे<br>५) आपल्या परीसराणे पक्ष्यांची माहिती संकलित करणे |
| ● साहित्य | : | पसरट भांडे,धागा, वळलेल्या गवताच्या काड्या. |
| ● सूचना | : | १) दाने व पाणी ठेवण्यासाठी पसरट भांडे वापरावे.<br>२)घरटी तयार करतांना पक्षांना टोचणार वा इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>३) जागेचा विचार करुनच घरटी तयार करावी. |
| ● Learning intervention | : | ग्रुप, वैयक्तिक |
| ● 6 Cs | : | करुणा, सर्जनशीलता , चिकित्सक विचार |
| ● 9 Intelligences | : | बुद्धिमता तार्किक, शरीरस्नायूविषयक |

## उपक्रम 34

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **चला पाककृती शिकूया.** |
| ● उद्देश | : | १) स्वयंपाक घरात विविध प्रकारचे सोपे पदार्थ तयार करणे.<br>२) स्वयंपाक घरात कुकर आईच्या मदतीने लावणे.<br>३)उन्हाळ्याणे उकाड्यापासून बचाव करण्याच्यादृष्टीने स्वयंपाक घरात,<br>घरच्यांसाठी ताक (मठ्ठा) व लस्सी तयार करणे.<br>४) सहज बनवता येईल असे सोपे सोपे खाद्य पदार्थ तयार करणे. |
| ● साहित्य | : | खाद्यपदार्थांसाठी लागणारे साहित्य . |
| ● सूचना | : | १) सोपे सोपे पदार्थ तयार करतांना सांड उबड होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>२) स्वयंपाक घर पदार्थ तयार केल्यानंतर स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी. |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक, ग्रुपमध्ये |
| ● 6 Cs | : | आत्मविश्वास, सर्जनशीलता |
| ● 9 Intelligences | : | शरिरस्नायू विषयक, निरीक्षण क्षमता |

## उपक्रम 35

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | **चला पत्रव्यवहार शिकूया...** |
| ● **उद्देश** | : | १) परिसराणे पोष्ट कार्यालयाच्या कामकाजाविषयी माहिती करून घेणे.<br>२) मित्रांना व शिक्षकांना पत्र लेखन करणे.<br>३) लिहिलेली पत्रे घरापर्यंत पोहोचतात याची माहिती घेणे. |
| ● **साहित्य** | : | पत्र, पेन, नोंदवही |
| ● **सूचना** | : | पोस्ट कार्यालय भेटीत मिळालेली माहिती काळजीपूर्वक नोंदवून ठेवावी. |
| ● **Learning intervention** | : | ग्रुपमध्ये, वैयक्तिक |
| ● **6 Cs** | : | संवाद, आत्मविश्वास, सर्जनशीलता |
| ● **9 Intelligences** | : | तार्किक बुद्धिमत्ता, भाषिक बुद्धिमत्ता, आंतरव्यक्ती बुद्धिमत्ता |

## उपक्रम 36

| | | |
|---|---|---|
| | | **चला व्यावसायिक होऊया..** |
| ● **उपक्रम** | : | अ) गावातील सैनिक, डॉक्टर, दुकानदार, व्यवसायिक किंवा यशस्वी लोकांच्या मुलाखती घ्या.<br>ब) परिसरात चालणाऱ्या व्यवसायाविषयी माहिती मिळवा.उदा. फर्निचर काम. सूप, टोपली, विणकाम, सुतारकाम इत्यादी |
| ● **उद्देश** | : | १) परिसरातील नावलौकिक असणारे डॉक्टर, लेखक,इंजिनिअर, सैनिक,दुकानदार व व्यावसायिक यांची मुलाखत घेणे.<br>२) आपल्या परिसराणे व्यवसायांची माहिती अचूकपणे गोळा करणे.<br>३) सभोवताली असणाऱ्या एखाद्या छोट्या लघु उद्योगाची माहिती जाणून घेणे. |
| ● **साहित्य** | : | नोंदवही, पेन, मोबाईल, लिखित प्रश्नावली. |
| ● **सूचना** | : | १) मुलाखत घेतांना वैयक्तिक प्रश्न टाळावेत.<br>२) प्रतिष्टीत व्यक्तींची मुलाखत घेतांना विनम्रता ठेवावी.<br>३) रात्र झाल्यास मुलाखतीस जावू नये. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, गटात |
| ● **6 Cs** | : | आत्मविश्वास, संवाद, करुणा, चिकित्सक विचार |
| ● **9 Intelligences** | : | भाषिक बुद्धिमता, अंतर व्यक्ती बुद्धिमता, निरीक्षण क्षमता |

# उपक्रम 37

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **व्यवसायात थोडी मदत करुया.** |
| ● उद्देश | : | १) आपल्या कुटुंबाच्या व्यवसायाची माहिती जाणून घेणे.<br>२) आईवडीलांच्या व्यवसायाचा सन्मान करणे.<br>३)आपल्या कुटुंबासाठी घरच्या व्यवसायाचे महत्व समजून घेणे.<br>४) आपल्या व्यवसायाची व्यापकता समृद्ध होते.<br>५) विना व्यवसाय कुटुबांची स्थिती लक्षात येते. |
| ● साहित्य | : | व्यवसायाचे चित्र, नोंदवही, पेन. |
| ● सूचना | : | १) व्यवसायाची अहिती समजून घेतांना सकारात्मकता ठेवावी.<br>२) कुटुंबाला नित्याने मनापासून मदत करणे.<br>३) व्यवसायाची अवहेलना, मस्करी करू नये. |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक |
| ● 6 Cs | : | संवाद , करून , आत्मविश्वास |
| ● 9 Intelligences | : | भाषिक बुद्धिमता, तार्किक बुद्धिमता, निरीक्षण क्षमता. |

## उपक्रम 38

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | भौमितिक गणित शिकूया. |
| ● **उद्देश** | : | १) विविध भौमितिक आकृत्यांची ओळख करून घेणे.<br>२) परिसराणे विविध भौमितिक गणितांची माहिती घेणे.<br>३) घराच्या बांधकामाणे फरशीचे मोजमाप, जागेच्या क्षेत्रफळाचे मोजमाप यांची अचूकपणे माहिती मिळविणे..<br>४) बांधकाम करणारे गवंडी कशा पद्धतीने क्षेत्रफळाचे मोजमाप करतात यांचे बारकावे लक्षात घेणे.. |
| ● **साहित्य** | : | टेप, पेन, टिपण वही, मोबाईल |
| ● **सूचना** | : | १) बांधकामाचे निरीक्षण करतात.<br>२) इजा होणार नाही याची काळजी घ्यावी.<br>३) भौमितिक आकृत्यांचे मोजमाप करताना अचूकपणे नोंदी घ्याव्या.<br>४) टेपने मोजमाप करतांना काळजी घ्यावी. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, गटात. |
| ● **6 Cs** | : | संवाद, सर्जनशीलता, चिकित्सक विचार |
| ● **9 Intelligences** | : | भाषिक बुद्धिमता, तार्किक बुद्धिमता, शरीर स्नायू , निरीक्षण क्षमता. |

## उपक्रम 39

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **जून्या साड्यांपासून पायपुसणे तयार करायला शिकूया.** |
| ● उद्देश | : | १) पायपुसनी बनविण्याची माहिती मिळविणे.<br>२) घराणे खराब जून्या साड्या गोळा करणे.<br>३) जून्या साड्यापासून पायपुसनी बनविण्याची माहिती नोंदवहीत लिहिणे.<br>४) विविध रंगांच्या साड्यापासून रंगीत पायपुसनी बनविणे. |
| ● साहित्य | : | सुई, धागा, कात्री , जुन्या साड्या |
| ● सूचना | : | १) कात्रीचा वापर करतांना काळजी घ्यावी.<br>२) सुईचा वापर करतांना इजा होवू देऊ नये. |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक |
| ● 6 Cs | : | संवाद, सर्जनशीलता, आत्मविश्वास |
| ● 9 Intelligences | : | तार्किक बुद्धिमता, शरीर स्नायू विषयक बुद्धिमता |

# उपक्रम 40

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | चला वाळवण तयार करण्यास आईला मदत करुया<br>वाळवण ही खऱ्या अर्थाने उन्हाळी सुटीची अनं ग्रामीण जीवनाची विशेषत: आहे असे म्हणायला हरकत नाही.तेव्हा चला या वाळवणाला तयार करण्यासाठी आईला छान मदत करुया |
| ● **उद्देश** | : | १) वाळवणाची माहित संकलित करणे.<br>२) वाळवणाची माहित सहजतेने व्यक्त करणे.<br>३) आईला वाळवण करण्यासाठी मनापासून मदत करणे. |
| ● **साहित्य** | : | अंथरण्यासाठी, वाळवण्यासाठी लागणारे साहित्य |
| ● **सूचना** | : | १) वाळवण खराब होणार नाही.<br>२) नासाडी होणार नाही, याची काळजी घ्यावी. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक |
| ● **6 Cs** | : | संवाद , करुणा |
| ● **9 Intelligences** | : | आंतरिक बुद्धिमता, शरीर स्नायू विषयक बुद्धिमता |

## उपक्रम 41

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | **पुस्तक हे मस्तक आहे....**<br>जगाचा समग्र आधार, मानवतेच्या कल्याणाचे शिल्पकार म्हणजेच पुस्तके. माणसाला घडविणारे सोज्वळ आधारवड म्हणजे पुस्तके.<br>तेव्हा चला तर मग जाणून घेऊयात कसे ..... "पुस्तक हे मस्तक" आहे... |
| ● **उद्देश** | : | १) विविध प्रकारचे पुस्तके गोळा करणे.<br>२) एक आठवडा एक पुस्तकांचे वाचन मनापासून करणे.<br>३) वाचलेल्या पुस्तकाणे आशय अचूकपणे समजून घेणे.<br>४) उपलब्ध पुस्तकांचे स्वतः चे वाचनालय तयार करणे.<br>५) पुस्तकांचे महत्व लेखन करणे.<br>६) एक तास एक विषय याप्रमाणे विविध विषयांवर स्वतः चे मत, लेखन रुपात साकारणे. |
| ● **साहित्य** | : | नोंदवही, पेन, विविध प्रकरची पुस्तके. |
| ● **सूचना** | : | १) पुस्तकाचे आदर्शवत संकलन करणे.<br>२) समजलेला आशय अचूकपणे लेखन करणे. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक, गटात |
| ● **6 Cs** | : | संवाद, करुणा, सर्जनशीलता, चिकित्सक विचार. |
| ● **9 Intelligences** | : | भाषिक बुद्धिमता, तार्किक बुद्धिमता, इरीक्षण क्षमता बुद्धिमत्ता. |

## उपक्रम 42

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **चला मनातलं कागदावर लिहूया...**<br>आपल्या मनातलं हितगुज व्यक्त करण्यासाठी कोणीतरी हवय तेव्हा मनातल्या भावनांना कागदावर मोकळं करूया! |
| ● उद्देश | : | १) आपण अनुभवलेला एखादा प्रसंग कागदावर जसेच्या तसे लिहिणे.<br>२) प्रत्यक्ष पाहिलेल्या प्रसंगाचे लेखन करणे.<br>३) मनात येणारे प्रसंगानुरूप शब्द , वाक्य कागदावर लिहुन काढणे.<br>४) मनातल्या शब्दांना , वाक्यांना कागदावर लिहिल्यानंतर त्याचा अर्थ समजून सांगणे. |
| ● साहित्य | : | नोंदवही, कोरी पाने, पेन. |
| ● सूचना | : | मनातले प्रसंगानुसार शब्द, वाक्य कागदावर ,अचूकपणे लिहावे. |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक , गटात |
| ● 6 Cs | : | आत्मविश्वास, सर्जनशीलता, चिकित्सक विचार. |
| ● 9 Intelligences | : | भाषिक बुद्धिमता, आंतर व्यक्ती बुद्धिमता |

# उपक्रम 43

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **चला मोबाईलवरील सुविचारांचा संग्रह करूया....**<br>जे शब्द,वाक्य,सुविचार आपल्यासह इतरांनाही प्रेरित करत असेल तेव्हा अशा सुविचारांचा आपण आवर्जून संग्रह करायला हवा |
| ● उद्देश | : | १) आपल्याला आवडलेली मोबाईल वरील संदेश सुविचार गोळा करणे.<br>२) मोबाईल वरील आवडलेल्या सुविचारांना आपल्या नोंदवहीत टिपून घेणे.<br>३) नोंदवहीत नोंदविलेल्या प्रत्येक सुविचारांचा अर्थ अचूकपणे समजून घेणे. |
| ● साहित्य | : | नोंदवही, पेन,मोबाईल. |
| ● सूचना | : | १) आवडते संदेश , सुविचार हे नोंदवहीत लिहितांना, सुवाच्च अक्षरे काढावीत.<br>२) इतरांना सुविचार सांगतांना , स्पष्टपणे सांगावा. |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक, ग्रुप मध्ये |
| ● 6 Cs | : | संवाद, करुणा, सर्जनशीलता, आत्मविश्वास |
| ● 9 Intelligences | : | भाषिक बुद्धिमता , तार्किक बुद्धिमता, आंतरिक बुद्धिमता. |

## उपक्रम 44

| | | |
|---|---|---|
| ● उपक्रम | : | **चला सुटीतील मजा लुटूया...**<br>प्रत्येक उन्हाळी सुट्टी ही मौजेची, आनंदाची मेजवानी असते तेव्हा आपल्या आवडीने व छंदाला जोपासून या सुट्टीची खरी मजा लुटुया |
| ● उद्देश | : | १) उन्हाळी सुट्टीत विविध गाणी,गप्पा,गोष्टींची स्वनिर्मिती करणे.<br>२) दैनंदिन व्यवहाराणे अनुभव थोडक्यात रोजनिशीत लेखन करणे.<br>३) उन्हाळी सुट्टीत सराव करावयाच्या गाण्यांची यादी तयार करणे. |
| ● साहित्य | : | नोंदवही, पेन, दैनंदिनी, कवितांचे पुस्तके,विविध प्रकारच्या गोष्टींची पुस्तके, मोबाईल. |
| ● सूचना | : | १) गोष्टींची निवड करताना त्या प्रेरक स्वरूपाच्या असाव्या<br>२) गाण्यांचा सराव करताना ती गाणी त्याला सूरात म्हणावी<br>३) दैनंदिनी मध्ये लेखन सुवाच्य अक्षरात करावे |
| ● Learning intervention | : | वैयक्तिक, गटात |
| ● 6 Cs | : | संवाद, आत्मविश्वास, सर्जनशीलता,चिकित्सक विचार |
| ● 9 Intelligences | : | भाषिक बुद्धिमता, तार्किक बुद्धिमता, आंतरिक बुद्धिमता |

## उपक्रम 45

| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | चला पाण्याची काळजी घेऊया... पाणी हेच जीवन आहे, अशा जीवनरूपी पाण्याला आपण योग्य रीतीने वापरले पाहिजे, पाण्याची काळजी घेउया, पाणी वाचवूया! |
| ● **उद्देश** | : | १) पाण्याविना जगाची कल्पना व्यक्त करणे.<br>2) पाणीटंचाई यावर काय काय करता येईल त्यांची यादी तयार करणे.<br>3) सार्वजनिक ठिकाणी नळाद्वारे वाया जात असणाऱ्या तोट्या/नळ बंद करणे. |
| ● **साहित्य** | : | नोंदवही, पेन, मोबाईल, पाणी टंचाई तक्ता / चार्ट |
| ● **सूचना** | : | पाण्या विषयीची माहिती अचूक नोंदवावी**.** |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक , गटात |
| ● **6 Cs** | : | संवाद, आत्मविश्वास, सर्जनशीलता, चिकित्सक विचार |
| ● **9 Intelligences** | : | भाषिक बुद्धिमता, तार्किक बुद्धिमता, निरीक्षण क्षमता, आंतरिक बुद्धिमता. |

## उपक्रम 46


| | | |
|---|---|---|
| ● **उपक्रम** | : | **फावल्या वेळात घरी कृती शिकूया** |
| ● **उद्देश** | : | १) विविध कृतींची माहिती गोळा करणे.<br>२) फावल्या वेळात फाटलेल्या कपड्यांन शिवणे.<br>३) तुटलेल्या बटन जागी नवीन बटण लावणे.<br>४) एक आवड म्हणून फावल्या वेळात शिवणकाम शिकणे. |
| ● **साहित्य** | : | सुई, धागा, बटण, कात्री विविध रंगांचे धागे |
| ● **सूचना** | : | १) कात्री चा उपयोग करताना इजा होणार नाही याची दक्षता घ्यावी<br>२) बटन टाचत असताना बोटात सुई टोचणार नाही याची काळजी घ्यावी. |
| ● **Learning intervention** | : | वैयक्तिक |
| ● **6 Cs** | : | करुणा, सर्जनशीलता, आत्मविश्वास |
| ● **9 Intelligences** | : | तार्किक बुद्धिमता, शरीर स्नायू विषयक बुद्धिमता |

# श्रेयनामावली

| | | |
|---|---|---|
| 1 | राम राजेश्वर बुसमवार | जि.प.प्रा.शाळा बेंदी तांडा, ता.किनवट, जि.नांदेड. |
| 2 | जयश्री बबन सरके | जि. प. प्रा. शाळा भिगवण ता. इंदापूर. जि. पुणे |
| 3 | विशाल देवेंद्र देवतळे | देशमुख माध्यमिक विद्यालय हिंगणा, ता. हिंगणा. जि. नागपूर |
| 4 | हेमलता पंचम पाटील | जि.प.प्रा.शाळा नागेश्वरनगर, ता. कामठी, जि.नागपूर |
| 5 | विश्वनाथ शिवाजीराव साखरे | जि. प. प्रा. शाळा मंडगी ता. देगलूर. जि नांदेड. |
| 6 | नितीन दशरथ मेमाणे-पाटील | जि.प.प्रा.शाळा पांडे, ता.भोर, जि.पुणे. |
| 7 | प्रणिता महादेव टोंगे | शांतीनिकेतन माध्यमिक विद्यालय राजीव गांधीनगर ता.जि.नागपूर. |
| 8 | ललित उदापुरे | वेध परिवार |
| 9 | राहुल गुरड | वेध परिवार |


# वेध पब्लिकेशन ची पुस्तके










आपणसुद्धा आजच खरेदी करा

“आम्ही पुस्तके घेतली, आपणसुद्धा आजच मागणी करा.”














# वेध पब्लिकेशन वाचक अभिप्राय

# आजच संपर्क करा- 9890018388

## वाचक अभिप्राय - वेध पब्लिकेशन

❝ केवळ मी शिकवतो म्हणून मुलांना येते, हा विचार बाजूला करून मुलांना काय आवडते, ह्या गोष्टी हेरून व्यवहारातील छोट्या छोट्या गोष्टींमधून मुलांचे शिकणे कसे होते, यांची खूप सारी उदाहरणे यापुस्तकामध्ये वाचायला मिळाली. यामध्ये हे पटवून दिले आहे की केवळ पुस्तकातले शिकवणे म्हणजेच शिक्षण नाही तर मुलांना आवडणाऱ्या गोष्टी व दैनंदिन घरगुती प्रसंगातून मुलांचे किती शिकणे होत असते हे या दोन्हीही पुस्तकांमधून शिकायला मिळाले. प्रत्येक घटक मुलांना सहज समजेल अशा पद्धतीने हाताळला आहे. जर प्रत्येक शिक्षकांनी अशाच प्रकारचं वातावरण आपल्या वर्गात निर्माण केलं तर प्रत्येक मुलांमध्ये 21 व्या शतकातील कौशल्ये मुलांमध्ये रुजतीलच, असा विश्वास वाटतो. ❞











नितीन टाक
वेध जिल्हा संयोजक,
अमरावती

संपर्क
वेध पब्लिकेशन
9890018388

## वेध पब्लिकेशन पुस्तकांबाबत वाचकांचा अभिप्राय






श्री. सुपडा काशिराम माठे
सरस्वती प्राथमिक
आश्रम शाळा पिंपळगांव काळे

❝ आपण पाठ्यक्रम शिकवणे म्हणजेच मुलांचे शिकणे नाही, तर मुलांच्या आवडीनुसार छोट्या छोट्या कृती करून घेणे, मुलांचे भावविश्व ओळखून त्यांच्याकडून करून घेतलेल्या अगदी छोट्या छोट्या गोष्टी आणि त्यांना खेळाची जोड देणे अशा कृतींची मालिका म्हणजे ग्लिम्पसेस ऑफ लर्निंग या पुस्तकातील संवाद होय.
मुलांचे शिकणे अगदी सहज व्हावे याकरिता प्रत्येक शिक्षकाने हे पुस्तक वाचायला हवे.
धन्यवाद वेध पब्लिकेशन! ❞

**मोफत घरपोच मागणीसाठी संपर्क**

वेध पब्लिकेशन मो. 9890018388

❝ वेध पब्लिकेशनचे Spoken English वेध कृती हे पुस्तक शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि ज्यांना ज्यांना इंग्रजी बोलण्याची गरज आहे, आवड आहे अशा सर्वांसाठी हे पुस्तक मैलाचा दगड ठरणार आहे. आजपर्यंत बाजारात आलेल्या अशा पुस्तकांची संख्या खूप मोठी आहे. परंतु ग्राऊंड रुटला शिकणाऱ्याच्या काय अडचणी असतात, ते कोणालाच माहित नसतात. या वेधकृती बनवताना शिकणारी मुले, पालक, शिक्षक यांच्या भावविश्वाचा विचार केला आहे. त्यांच्या उपलब्धतेचा विचार केला आहे. त्यामुळे यांना काय हवंय ते डोळ्यांसमोर ठेवून त्या कृती बनवल्या आहेत. म्हणून मला वाटते, हे पुस्तक आम्हा सर्वांसाठी खूपच उपयुक्त आहे. एवढ्या कृती जरी केल्या तरी माणूस इंग्रजी बोलू शकतो. असा मला विश्वास वाटतो. धन्यवाद वेध पब्लिकेशन! ❞


श्री.अशोक निकाळजे
जि.प. प्रा. शा. अगर नांदुर
ता. गेवराई, जि. बीड




**मोफत घरपोच मागणीसाठी संपर्क**

वेध पब्लिकेशन
मो. 9890018388

## वाचक अभिप्राय - वेध पब्लिकेशन







Free Home Delivery

❝ नमस्कार, नुकतेच मी वेध पब्लिकेशन चे ग्लिम्पसेस ऑफ लर्निंग हे पुस्तक वाचले. यात शिक्षकांचे मुलांसोबतचे प्रेमळ आणि मुक्त नाते दिसून आले. पारंपारिकतेकडून भविष्यवेधी शिक्षण पद्धतीकडे जाताना २१ व्या शतकातही मुलांना कसं जपावं, त्यांना शिकते कसे करावं हे खूपच प्रभावी वाटले. मूल समजून घेतानाची प्रेरणा, मुलांकडूनच मुलांना शिकते करण्याची युक्ती, उपलब्ध परिस्थिती, क्लृप्ती, मुले शिकण्याची तिप्पट गती, दैनंदिन जीवनातून शैक्षणिक अनुभवांद्वारे आपण कसे समृद्ध होत जाऊ, याविषयीचे छोटे छोटे पण भन्नाट उपयोगी असे किस्से वाचताना खरंच मी प्रत्यक्ष त्या वर्गात, वातावरणात रममाण होऊन गेले. या पुस्तकातील किस्से वाचताना एक वेगळ्याच प्रकारची मोहिनी मनाला भुलवून जाते. शेवटी पुस्तकात एक वाक्य आहे, 'इच्छा माझी पुरी झाली....' वेध पब्लिकेशन नी अशाच प्रकारे अनेक पुस्तके लिहून आम्हा शिक्षक, वाचकांच्या इच्छा नेहमीच पुऱ्या 😊 कराव्यात ही अपेक्षा! धन्यवाद वेध! 🙏 ❞

शिल्पा अशोकराव तवर
ता. वसमत, जि. हिंगोली

संपर्क
वेध पब्लिकेशन
9890018388